# प्रतिबिंब

सोमनाथ कोमरपंत

। वर्षत सकळमंगळी ।

गोमंतक मराठी अकादमी

प्रकाशन क्र. ४८
पहिली आवृत्ती : मार्च २००२

© सोमनाथ कोमरपंत

मूल्य : ८५ रुपये

मुखपृष्ठ : किशोर करमरकर

प्रकाशक
गोमंतक मराठी अकादमी
४था मजला, राणी प्रमिला आर्केड
१८ जून मार्ग
पणजी-गोवा ४०३ ००१

प्रमुख विक्रेते
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

मुद्रक
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

# लेखकाचे मनोगत

'प्रतिबिंब' या पुस्तकात मराठीतील महत्त्वाच्या कवींविषयींचे आणि काव्यसृष्टी-विषयीचे लेख समाविष्ट केलेले आहेत. पु. शि. रेगे, शांता शेळके, वसंत सावंत, शंकर रामाणी आणि ना. धों. महानोर यांनी दीर्घ काळ काव्यसाधना केलेली आहे. १९६० नंतरच्या मराठी काव्यात वसंत सावंत, शंकर रामाणी आणि ना. धों. महानोर यांनी आपल्या काव्यकर्तृत्वाने स्वत:ची मुद्रा उमटविली आहे. या कवींच्या भावविश्वात निसर्गानुभूतीला प्राधान्य लाभलेले आहे. त्याचबरोबर आत्मानुभूतीचे उत्कट अंत:सूर त्यातून प्रकट झालेले आहेत. या भावसृष्टीचा आस्वादक अंगाने परामर्श घेण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. मराठी आणि कन्नड कवितेमध्ये सेतू निर्माण करणाऱ्या कविवर्य द. रा. बेंद्रे यांच्यावरील लेखाचाही समावेश केलेला आहे.

रवींद्रनाथ टागोर, वि. स. खांडेकर आणि विनोबा भावे हे वाङ्मयीन संस्कृतीचे नि:सीम उपासक. किंबहुना व्यापक भारतीय जीवनसंचिताचे ते भाष्यकार. रवींद्रनाथांचा 'पोरवय'मधील हृद्य संस्मरणे आणि सव्यसाची साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी केलेला त्याचा सरस, रमणीय अनुवाद हा अनिर्वचनीय आनंदानुभूतीचा ठेवा आहे. त्यांच्या समृद्ध बालपणाच्या अंतरंगात प्रवेश करताना तरल स्वप्नसृष्टीत आपण मनाने वावरत आहोत असे रसिकाला वाटते. वि. स. खांडेकर यांनी नंतरच्या पिढ्यांवर वाङ्मयीन संस्कार केले. अभिरुचीला वळण लावले. विनोबा भावे यांनी आपल्या चिंतनशील वृत्तीने आणि प्रसन्न शब्दकळेने मराठी साहित्य रसिकांना आल्हाद दिला. या समाजमनस्क साहित्यिकांविषयी कृतज्ञतेने लिहावेसे वाटले. काही महत्त्वाच्या समकालीन साहित्यकृतींचा आस्वाद घेणाऱ्या लेखांचा या पुस्तकात समावेश केलेला आहे. त्यांच्या वाचनाने माझ्या मनात जे तरंग उमटले त्यांना शब्दरूप देण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे.

गोमंतक मराठी अकादमीच्या प्रकाशन योजनेखाली 'प्रतिबिंब' हा लेखसंग्रह प्रसिद्ध होत आहे याचा मला आनंद झाला. या संस्थेविषयी माझ्या मनात अत्यंत ममत्वाची भावना आहे. वेळोवेळी तिच्याकडून प्रोत्साहन मिळाले. त्याविषयी मनात निरंतर कृतज्ञता राहील. शब्दांतून ती प्रकट करणे औपचारिकपणाचे ठरेल. गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. गोपाळराव मयेकर आणि कर्मचारीवर्ग यांचा मी अत्यंत आभारी आहे.

या पुस्तकाच्या निर्मितीत महत्त्वाचा वाटा उचलल्याबद्दल 'लोकवाङ्मय गृहा'चेही अंत:करणपूर्वक आभार. ज्या नियतकालिकांतून हे लेख पहिल्यांदा प्रसिद्ध झाले त्यांच्या संपादकांविषयी कृतज्ञता प्रकट करतो.

— **सोमनाथ कोमरपंत**

ए-१७/५, स्टाफ क्वार्टर्स,
गोवा विद्यापीठ, ताळगाव पठार, गोवा ४०३२०६

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | केशवसुतांची निसर्गकविता | १ |
| २. | कविवर्य द. रा. बेंद्रे यांची मराठी कविता : कन्नड आणि मराठी कवितेचे संगमतीर्थ | १० |
| ३. | पु. शि. रेगे यांचे काव्यलेखन | २० |
| ४. | प्रा. शांता शेळके यांचा भावसमृद्ध काव्यप्रवास | २६ |
| ५. | कविता शंकर रामाणींची | ३५ |
| ६. | मराठी कवितेच्या अंगणातील सोनचाफ्याचे भावसमृद्ध झाड | ४८ |
| ७. | ना. धों. महानोर यांची निसर्गकविता | ५६ |
| ८. | वाङ्मयीन संस्कृतीचे उपासक : वि. स. खांडेकर | ६४ |
| ९. | विनोबा भावे यांची वाङ्मयीन मुद्रा | ७१ |
| १०. | बा. भ. बोरकरांचे कथालेखन | ७८ |
| ११. | प्रा. गंगाधर गाडगीळ यांचे समृद्ध व्यक्तिमत्त्व | ८४ |
| १२. | रवींद्रनाथांचा स्वप्नलोक | ८९ |
| १३. | 'चार्ली चॅप्लिन' : थोर कलावंताच्या जीवनपटाचे विलोभनीय दर्शन | ९८ |
| १४. | खांडेकरांच्या 'क्रौंचवध'मधील जीवनानुभूतीचे स्वरूप | १०५ |
| १५. | 'बंध-अनुबंध' : एका मनस्विनीच्या चिंतनाचा हृदयंगम आविष्कार | ११२ |
| १६. | 'लोकसरिता' : गोमंतकीय जनजीवनाविषयीचा महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ | १२० |